# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग /२०/८९.क्र.प्र/२०२०-संकीर्ण .शासन निर्णय क्र , १-शिक्षणदि१३.१२.२०२२. अन्वये ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.१७.०५.२०२४ रोजी मा.आयुक्तवैद्यकीय ) , लीयांच्या अध्यक्षतेखा (शिक्षणआयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई, यांच्या दालनात दुपारी ०३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती .सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते-:

१) उप सचिव तथा सदस्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.
३) अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.
५) सहाय्यक संचालक, (लेखा) वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
६) श्री. कैलास गांधी निमंत्रित सनदी लेखापाल.
७) श्रीमती. वैशाली बापट निमंत्रित परिव्यय लेखापाल.

उपरोक्त बैठकीत उपस्थित मुद्दे व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत

| अ. क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ साठी सादर प्रस्तावांचा दि.१७/०५/२०२४ पर्यंत तपशील. | ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदाविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क सन २०२३-२४ साठी खालील प्रमाणे पर्यंत प्रस्ताव प्राप्त व प्रक्रिया झालेले आहेत.<br><br>**ऑनलाईन मार्गाने प्राप्त प्रस्ताव संख्या - ७९५**<br>हार्ड कॉपी प्राप्त न झालेल्या - ०१५<br>प्रस्ताव मंजूर संख्या - ७०२ | |

| अ. क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| | | त्रुटी पाठविलेले प्रस्ताव संख्या - ०७८<br>**पुनर्विलोकन प्रस्ताव संख्या - ०५०**<br>बैठकीत सादर प्रस्ताव - ०३५<br>पुनर्विलोकन बाकी प्रस्ताव -०१५ | |
| २ | नॅशनल स्कूल ऑफ नर्सिंग, अकोला यांनी, शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेले शिक्षण शुल्क व त्यासंबंधित बाबींवर सादर केलेल्या आक्षेपांवर चर्चा. | सदर संस्थेचे शुल्क निर्धारण शुल्क समितीच्या मानकांनुसार करण्यात आलेले आहे. सदर संस्थेने विहित कालावधीत पुनर्विलोकन(Review) अर्ज सादर केलेला नसल्याने त्यांनी विहित शुल्क भरून पुनर्विलोकन प्रस्ताव सादर करावा असे सदर संस्थेस कळविण्यात यावे. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ३ | शै.व. २०२१-२२ मधील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्राप्त नसल्यामुळे लेखापरीक्षण(ऑडिट) न झाल्यामुळे प्रस्ताव सादर न केलेल्या व मागील वर्षीचे मंजूर शुल्क शै.व. २०२३-२४ करिता मंजूर करून मिळावे अशी मागणी केलेल्या संस्था -<br>अ) सहारा इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग | विद्यार्थी शिष्यवृत्ती प्राप्त नसणे व लेखापरीक्षण न करणे याचा परस्पर संबंध दिसून येत नाही. याकारणाने मागील शुल्क सदर शै.व. २०२३ -२४ करिता मंजूर करता येणे शक्य नाही. महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी सदर संस्थांची सक्षमता तपासणी करून त्याचा अहवाल परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती यांस सादर करावा. | महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, |

| अ. क्र | मुद्या | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| | एजुकेशन,अकलूज, सोलापूर<br>ब) धन्वंतरी स्कूल ऑफ नर्सिंग एजुकेशन,अकलूज, सोलापूर<br>क) स्वामी समर्थ नर्सिंग स्कूल,बार्शी, सोलापूर<br>ड) प्रभाकर इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग एजुकेशन, पेण,रायगड यांवर चर्चा. | | |
| ४ | महात्मा फुले नर्सिंग स्कूल,बाभुळगाव सदर संस्थेला शै.व.२०२१-२२ करिता एप्रिल २०२२ मध्ये मान्यता प्राप्त झाल्यामुळे आर्थिक वर्ष २०२१-२२ चे लेखापरीक्षण (ऑडिट) होऊ शकत नसल्यामुळे प्रस्ताव सादर न केलेल्या संस्थेच्या पत्रावर चर्चा. | सदर संस्थेला शै.व. २०२१-२२ करिता शासन मान्यता दि.०७ एप्रिल २०२२ प्राप्त झाल्यामुळे आर्थिक वर्ष २०२१-२२ चे लेखापरीक्षण शक्य नाही व त्यामुळे शै.व. २०२३ -२४ करिता शिक्षण शुल्क मंजुरी प्रस्ताव दाखल केलेला नाही असे संस्थेने कळविलेले आहे. परंतु सदर संस्थेने विहित वेळेत शै.व.२०२३-२४ साठी शिक्षण शुल्क समितीकडे शुल्क मंजुरी प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते. सदर संस्थेने २०२३-२४ साठी ठरलेल्या प्रक्रिया शुल्काव्यतिरिक्त दंड रक्कम रु.१,००,०००(रुपये एक लाख फक्त) सहित उपलब्ध सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करण्याबाबत संस्थेस पत्राद्वारे अथवा इ-मेल द्वारे कळविण्यात यावे. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ. क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ५ | Private Nursing Schools & Colleges Management Association (Maharashtra State) यांच्या शुल्क निश्चितीबाबत व पोर्टल मधील दुरुस्तीबाबत पत्रावर चर्चा. | 1) **ANM/GNM व इतर परिचर्या महाविद्यालयाकडून शिक्षण शुल्क समितीने आकारावयाचे शुल्क**-अपील करावयाचे शुल्क रु. ५००००/- अवास्तव आहे. ती कमी आकारण्यात यावी.<br><br>2) **टीचिंग व नॉन-टीचिंग स्टाफच्या पगाराच्या तरतुदीबाबत -**<br><br>3) **नॉन-टीचिंग स्टाफच्या कपातीबाबत-**<br><br>4) **बस/वाहन खर्च ग्राह्य धरणेबाबत-**<br><br>5) **सन २०२१-२२ या वर्षाच्या शेवटी नवीन महाविद्यालयांना मंजुरी मिळालेली असल्यास त्यासंबंधित फीस मंजूरीबाबाबत-**<br><br>उपरोक्त ५ मुद्द्यांबाबत माहिती शिक्षण शुल्क समितीच्या पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात यावी.<br><br>6) **नर्सिंग डिप्लोमा कोर्स शिक्षण शुल्क समितीच्या पोर्टलमधील दुरुस्तीबाबत-**<br><br>ndcsss.info या पोर्टलवरील अनावश्यक Tabs काढून टाकण्याच्या अनुषंगाने संबंधित तांत्रिक तज्ज्ञांशी सल्लामसलत करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती<br><br>Bynaric System Pvt.Ltd.<br>परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ. क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |
| ६ | गुलाबराव पाटील इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग सायन्सेस , मिरज , सांगली यांनी, शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेले शिक्षण शुल्क व त्यासंबंधित बाबींवर चर्चा. | सदर संस्थेने (GNM) पुनर्विलोकनासाठी अर्ज दाखल केलेला असून त्याची सुनावणी दि.०९/०५/२०२४ रोजी झालेली आहे. त्यावरील निर्णय पुनर्विलोकनाच्या पुढील बैठकीत घेतला जाईल. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल.
उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

on leave.
अधिक्षिका, शुश्रुषा,
वैद्यकिय शिक्षण व संशोधन,
तथा सदस्य

सहाय्यक संचालक
(लेखा), वैद्यकिय शिक्षण व संशोधन,तथा सदस्य

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

उप सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तथा सदस्य सचिव

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
तथा अध्यक्ष